उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायमविना अनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची नियमावली लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीईटी-२०१९/प्र.क्र. १६८/मशि-२,
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ जुन, २०१९.

वाचा : १) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८,
२) शासन अधिसूचना क्र. : बी.एड ४६१६/प्र.क्र.१(भाग-२)/मशि-२, दि.०५.०५.२०१७,
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२५/मशि-२, दि. १२.०५.२०१७,
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.२१५/मशि-२, दि. १६.०५.२०१८,
५) शासन अधिसूचना क्र. : बी.एड ४६१९/प्र.क्र. ७८/मशि-२, दि. १४.०६.२०१९.

प्रस्तावना :-

संदर्भाधीन क्रमांक १ येथील अधिनियमातील कलम २३ अन्वये प्राप्त अधिकाराअंतर्गत संदर्भाधीन क्रमांक २ येथील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन] नियम, २०१७ राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षणशास्त्र (बी.एड व एम.एड) अभ्यासक्रमांचे व शारिरीक शिक्षण (बी.पी.एड व एम.पी.एड) अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये बी.ए.बी.एड(एकात्मिक), बीएस्सी.बी.एड (एकात्मिक) व बी.एड-एम.एड(एकात्मिक) या अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्यस्तरीय सामायिक प्रवेश

परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भाधीन क्रमांक ५ येथील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन] नियम, २०१७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर सुधारणा शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षक प्रशिक्षण विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या (बी.एङ, बी.पी.एङ, एम.एङ, एम.पी.एङ, बी.ए.बी.एङ(एकात्मिक), बीएस्सी.बी.एड (एकात्मिक) व बी.एड-एम.एङ (एकात्मिक)) प्रवेशासाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

संदर्भाधीन क्रमांक ५ येथील अधिसूचनेन्वये, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (शिक्षणशास्त्र पदवी, शारीरिक शिक्षण पदवी, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी) द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन] नियम, २०१७ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणा, राज्यातील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षणशास्त्र (बी.एङ, एम.एङ, बी.ए.बी.एङ(एकात्मिक), बीएस्सी.बी.एड (एकात्मिक) व बी.एड-एम.एङ (एकात्मिक) अभ्यासक्रमांचे व शारिरीक शिक्षण (बी.पी.एङ व एम.पी.एङ) अभ्यासक्रमांच्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेसाठी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार उक्त सुधारणा शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राज्यातील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांच्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेसाठी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी लागू करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक ५ येथील अधिसूचनेतील नियमांचा शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अवलंब करुन शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षक प्रशिक्षण विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश परीक्षेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०६२४१२५२५०४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2019.06.24 12:58:07 +05'30'

(रोहिणी भालेकर)
शासनाचे उप सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१,
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
३. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
४. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
८. निवड नस्ती/मशि-२.